दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक ९५ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.५ जुलै २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## ८ जुलैपर्यंत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत पुढील चार दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता प्रादेशिक हवामान केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी वर्तविली आहे.

उत्तर कोकणातील मुंबई, ठाणे, रायगड, पालघर आणि दक्षिण कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी जिल्ह्यातील काही भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तर–मध्य महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, नंदुरबार आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील घाट क्षेत्रात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच दि. ५ जुलै रोजी मराठवाड्यातील औरंगाबाद, जालना, हिंगोली, परभणी, नांदेड, बीड, लातूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील काही भागात ३०–४० किलोमीटर प्रतीतास वेगाने वादळ वारा व विजेच्या गडगडाटासह मध्यम ते मुसळधार स्वरुपाचा पाऊस तर दि. ६ व ७ जुलै दरम्यान मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# मुंबई ते गोवा महामार्गालगत चोळई येथे दरड कोसळली

## ७५नागरिकांचे सुरक्षित स्थलांतर ; अतिमुसळधार पावसाची शक्यता

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

**मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूर तालुक्यातील सडवली ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील चोळई गावात गेल्या वर्षी उत्खनन झालेल्या ठिकाणी अपेक्षेप्रमाणे यंदा दरड कोसळली आहे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या ठेकेदार एलअॅण्डटी कंपनीने गेल्यावर्षी या उत्खननाची जबाबदारी नाकारल्याने खासगीरित्या हे उत्खनन झाल्याचे स्पष्ट झाले होते. दरम्यान, पोलादपूर तालुका आपत्ती निवारण कक्षाने तातडीने घटनास्थळी जाऊन परिस्थितीचे गांभिर्य ओळखून चोळईतील सुमारे ७५ नागरिकांचे सुरक्षितठिकाणी स्थलांतर केल्याची माहिती निवासी नायब तहसिलदार समीर देसाई यांनी दिली.**



गेल्यावर्षी मोठ्याप्रमाणात चोळई गावात महामार्गालगत माती उत्खनन होत असताना संबंधित यंत्रणेने ग्रामस्थांच्या अर्जांची दखल न घेता हितसंबंध जोपासल्याची चर्चा सुरू होती. अशातच, तालुक्यात मातीमाफियांनी अनेक ठिकाणी बेकायदेशीररित्या उत्खनन करून अतिवृष्टीकाळात भुस्खलन होईल, अशी परिस्थिती निर्माण करून ठेवल्याने प्रशासनाकडून अभय मिळत गेले. यामुळे भुस्खलनासह लोकांच्या जिवितास तसेच मालमत्तेस धोका निर्माण होऊनही ग्रामस्थांच्या अर्जांकडे दूर्लक्ष केले गेले. अखेरिस, निसर्गाने त्याचे काम चोख बजावले आणि गेल्या वर्षी न कोसळलेली दरड यावर्षी मात्र कोसळू लागली.

पोलादपूर तालुक्यात रात्रीपासूनच धुवाँधार पावसामुळे कशेडी घाटातील चोळई येथे दरड कोसळली. गेल्यावर्षी याठिकाणी उत्खननामुळे दरडीचा धोका लक्षात घेऊन चोळईच्या ग्रामस्थांनी उठाव केला होता. मात्र, त्यावेळी अतिवृष्टीकाळात दरड न कोसळल्याने कोणताही संघर्ष झाला नव्हता. यंदा पावसाचा जोर वाढताच चोळई येथीलया उत्खननाच्याठिकाणी दरडी कोसळून रस्त्यावर येण्यास सुरूवात झाली. प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत सुरक्षेचा उपाय म्हणून चोळई येथील २० कुटुंबांतील सुमारे ७५ नागरिकांना सुरक्षित ठिकाणी विद्यामंदिर पोलादपूर येथे हलविले असल्याचा दावा केला आहे. मात्र, याठिकाणी अनेक ग्रामस्थांनी जीवाच्या भितीने आपआपल्या परगावांतील नातेवाईकांच्या घरी आश्रय घेतल्याची माहिती प्राप्त झाली आहे. गांव आणि ग्रामस्थ रिकामे करण्यासाठी प्रशासनाने बळाचा वापर केल्याचे यावेळी ग्रामस्थांचे मत झाल्याचेही अनेकांनी प्रस्तुत प्रतिनिधीस सांगितले.

दरडी कोसळल्याच्या ठिकाणी चौपदरीकरणाच्या कामामुळे डोंगराचा भाग कापण्यात आला असून पावसामुळे दरडीचे ढिगारेच्या ढिगारे दगड मातीसह महामार्गावर खाली कोसळत असल्याने या गावाला धोका निर्माण झाल्याचे लक्षात आले. यामुळे पोलादपूर तालुका प्रशासनाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत येथील नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवले आहे. यावेळी नायब तहसीलदार समीर देसाई, पोलीस निरीक्षक प्रशांत जाधव यासह आपत्ती निवारण कक्षाचे अधिकारी, कर्मचारी, पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## आनंदवाडी येथे अपघात २ ठार २ जखमी

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा आनंदवाडी येथे आज सकाळी ११वा. च्या दरम्यान तळा इंदापूर मार्गावर आमची आवड जवळ तळा कडून इंदापूर कडे इनोव्हा गाडी नं. MH 46 W 5177 घेऊन जात असता चालक जयेंद्र पारावे रा.बडदाड वाडी याचे गाडी वरील ताबा सुटल्याने वावे फाट्या कडून आनंद वाडी येथे अंगणवाडी सेविका प्रज्ञा प्रशांत सकपाळ वय ३२, सारीका संदीप जाधव वय ५ रियांश गणेश पवार ५, रिया गणेश पवार ४ येत असता सदर गाडी खाली सापडून प्रज्ञा प्रशांत सकपाळ व सारीका संदीप जाधव हे जागीच मृत झाले.

तर रियांश यास गंभीर दुखापत झाली. या अपघाता नंतर जखमी यांना पुढील उपचारासाठी अलिबाग व रिया हिला माणगांव उप जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. गाडी चालक यांस पोलीसांनी ताब्यात घेतल असून पुढील तपास पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांच्या मार्गदर्शना खाली सुरू आहे. गाडी चालक मद्यधुंद अवस्थेत गाडी चालवत होता अशी प्रार्थमिक माहिती मिळाली आहे.



## पनवेल परिसरात पावसाळी पर्यटन स्थळांच्या ठिकाणी कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पावसाळा सुरू झाला असुन पावसाळ्यात पनवेल तालुका ठाण्याचे हद्दीतील गाढेश्वर, (देहरंग) मोरबे ही धरणे तसेच वारदोली धबधबा, कुंडी धबधबा (अर्पीता फार्म हाऊस जवळील धबधबा), हरिग्राम नदीपात्र, धोदाणी नदीपात्र, चिंध्रण व मोहदर नदीपात्र, शांतीवन नदीपात्र, माची प्रबळ, कर्नाळा अभयारण्य असे पावसाळी पर्यटने असून, सदर परीसरात पावसाळ्यात अनेक पर्यटक फिरण्यास येतात. पर्यटक हे दर शनिवार व रविवार या दिवशी आपले कुटूबांसह व मित्रांसह येतात. अनेकाना पाण्यात जाण्याचा मोह आवरत नाही त्यामुळे अनुचित घटना घड़ते यासाठी पावसाळी पर्यटन स्थळांच्या ठिकाणी कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश देण्यात आले आहेत.




गाढेश्वर धरण परिसरात पावसाळ्यात दर शनिवार व रविवार या दिवशी सूमारे ४००० ते ५००० तरुण/तरुणी फिरण्यास येतात. व धरणातून येणाऱ्या नदी/नाल्याच्या पाण्यात उतरतात, सदर धरणातून येणारे पावसाचे पाणी हे कमी–जास्त प्रमाणात होत असते. धरणाचेवर माथेरान डोंगर भाग असुन तेथे पावसाचे प्रमाण नेहमी जास्त असते तेथे पाऊस पडल्याने, तसेच धरण परिसरात पाऊस पडत नसल्याने पर्यटक गाफिल असताना अचानक पाण्याच्या लोंढा वाढून खाली धरण परिसरात येतो व त्यात पर्यटक वाहुन जाऊन बुडून मयत होतात, असे अनेक प्रकार यापुर्वी झालेले आहेत. तसेच पोलीस ठाणे हद्दीतील कुंडी धबधबा (अर्पीता फार्म हाऊस जवळील धबधबा) इत्यादी ठिकाणी पर्यटक येत असतात. वरील बाबींचा जनतेच्या जिवीताची व

.../२

## व्हिप मोडणाऱ्या १४ आमदारांना शिंदे गटाकडून नोटीस

**दै.रायगड नगरी । मुंबई**

विधानसभेत विश्वासदर्शक ठरावावेळी विरोधात मतदान करणाऱ्या शिवसेनेच्या १४ आमदारांना शिंदे गटाकडून नोटीस बजावण्यात आली आहे. शिवसेनेच्या एकूण १५ आमदारांनी विश्वासदर्शक ठरावाच्या विरोधात मतदान केलं. मात्र शिंदे गटाकडून १४ जणांना नोटीस बजावण्यात आली आहे. आज विधिमंडळात शिंदे सरकारकडून विश्वासदर्शक ठराव मांडण्यात आला. या ठरावाच्या बाजूनं १६४ जणांनी मतदान केल्यानं सरकारनं बहुमत सिद्ध केलं. ९९ सदस्यांनी प्रस्तावाच्या विरोधात मतदान केलं. त्यात सेनेच्या १५ आमदारांचा समावेश होता. व्हिपचं उल्लंघन केल्याप्रकरणी १४ आमदारांना नोटीस देण्यात आल्याची माहिती शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी दिली. आम्ही आदित्य ठाकरेंना नोटीस दिलेली नाही. बाळासाहेब ठाकरेंचा आम्ही आदर करतो. त्यामुळेच आदित्य ठाकरेंना नोटीस बजावण्यात आलेली नाही, असं गोगावलेंनी सांगितलं. आदित्य ठाकरेंचं नाव अपात्र ठरवण्यासाठी देण्यात आलेलं नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल असलेला आदर हे त्यामागचं कारण आहे, असं गोगावले म्हणाले. विश्वासदर्शक ठरावाच्या बाजूनं मतदान करावं, यासाठी भरत गोगावलेंनी शिवसेनेच्या सर्व ५५ आमदारांना व्हिप बजावला होता. शिंदे गटात असलेल्या ४० आमदारांनी ठरावाच्या बाजूनं मतदान केलं. मात्र शिवसेनेच्या १५ आमदारांनी ठरावाच्या विरोधात मत दिलं. त्यामुळे शिंदे गटानं त्यांच्याविरोधात कायदेशीर कार्यवाही सुरू केली आहे. त्याचाच भाग म्हणून व्हिपचं उल्लंघन करणाऱ्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

## हिरकणी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी २१ कोटी रुपयांचा निधी देणार : मुख्यमंत्री

### पेट्रोल डिझेलवरील व्हॅट कमी करण्याबाबत लवकरच निर्णय

**दै.रायगड नगरी । मुंबई**

शेतकरी आत्महत्यामुक्त महाराष्ट्र करण्याचा निश्चय राज्य सरकारने केला असून राज्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी पेट्रोल डिझेल वरील व्हॅट कमी करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. विधानसभेत विश्वासदर्शक ठरावानंतर अभिनंदनाच्या प्रस्तावावर भाषणाच्यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते.



मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, रायगड पायथ्याशी असलेल्या हिरकणी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी २१ कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. या निधीतून हिरकणी गावाचा सर्वांगीण विकास साधला जाईल. केंद्र सरकारने काही दिवसांपूर्वी इंधनावरील कपात केली त्याच धर्तीवर राज्यातील जनतेला दिलासा देण्यासाठी इंधनावरील व्हॅट कमी करण्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे.

आगामी कालावधीत सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी निर्णय घेण्यात येतील. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या माध्यमातून साकारत असलेल्या समृद्धी महामार्गातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होवून राज्याच्या विकासाला चालना मिळेल. मुंबईतील मेट्रो प्रकल्पाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला जाईल. मेट्रो प्रकल्प गतीने पूर्ण करण्याकडे राज्य शासनाचे प्राधान्य असेल. राज्यातील सर्व प्रलंबित प्रकल्पांच्या कामांना गती देणार आहेत. तसेच शासनाच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे एकांगी निर्णय न घेता सर्वांच्या हितासाठी शासन प्रयत्न करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी दिली.

राज्य शासन सर्वांना बरोबर घेवून सर्व धर्मियांना

.../२

## तळा तालुका रेशन दुकानदारांचे विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालयात धरणे आंदोलन



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुका रास्त भाव धान्य दुकानदारांच्या प्रलंबित मागण्या मान्य करण्यासाठी आज ४ जुलै रोजी तालुक्यातील सर्व ३६ दुकानदारांनी धरणे आंदोलनाचा पावित्रा उचलून प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी तालुका संघटना अध्यक्ष जनार्दन (बबन) भौड, उपाध्यक्ष तानाजी कालप, सचिव रमेश कोलवणकर, संतोष ठसाळ, नथ–ुराम अडखळे, गणेश वाघमारे, मदन अडखळे, संजय माळी वगैरे सदस्यांनी तहसीलदार ए.एम कनशेट्टी यांना निवेदन सादर केले.

त्यांनी निवेदनात म्हटले आहे की, अखिल महाराष्ट्र स्वस्त धान्य दुकान महासंघाचे वतीने ८ जून रोजी दिल्ली व ३१ मे.२२ रोजी मुंबई येथे बैठकीत ठरल्याप्रमाणे केंद्र सरकारने २० रू.व दर्जा प्राप्त राज्यातील दुकानदारांना ३७/–रू.कमिशनची वाढ केलेली समाधानकारक नसून विरोध दर्शविला आहे. राष्ट्रीय खाद्य सुरक्षा योजना द्वारे फुड प्रोग्राम अंतर्गत रू.४४०/– प्रती क्विंटल कमीशन देण्यात यावे. गहू तांदूळ अंत्योदय कार्ड धारकांना या खाद्य पदार्थावर १ किल्लो प्रति क्विंटल हॅण्डलींग तूट देण्यात राज्यांनी त्वरीत निर्णय घ्यावा. दरमहा धान्य दुकानातून तांदूळ गहू व्यतिरिक्त

.../२

## प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उदघाटन



**दै.रायगड नगरी । उरण**

जे.एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था पनवेल व केअर ऑफ नेचर सामाजिक संख्या वेश्वी– उरण यांच्या संयुक्त विदयमाने आयोजित केलेल्या उरण तालुक्यातील वेश्वी येथे विविध विकास कामांचे उदघाटन पनवेल महानगर पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या हस्ते झाले. प्रथम श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला हार घालून पूजन करण्यात आले. तदनंतर पाहुण्यांचा सरकार समारंभ पार पडला.

त्यानंतर वेश्वि व जांभूळपाडा गावातील लोकांना ई श्रम कार्डचे वाटप करण्यात आले. यावेळी पाहुण्यांचे मनोगत झाले. युवा नेते प्रीतम मुंबईकर, महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर, महेंद्र मुंबईकर यांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. आम्ही वेश्विकर नावाचे लोकार्पण यावेळी करण्यात आले. स्वर्गीय गंगाबाई पदाजी मुंबईकर यांच्या नावाने गणेश घाटाचे लोकार्पण, रॉक अनिमल पार्कचे लोकार्पण, वृक्षारोपण आदी विविध विकासकामांचे उदघाटन युवा नेते प्रीतम म्हात्रे यांनी केले.

यावेळी माजी सरपंच नामदेवशेठ पाटील वेश्वी, माजी सरपंच शामशेठ मुंबईकर वेश्वी, माजी सरपंच एकनाथ माळी दिघोडे, सरपंच संदीप कातकरी वेश्वी, रामनाथ चांगु पाटील समाजसेवक, महेंद्र मुंबईकर सेक्रेटरी रायगड काँग्रेस, शांताराम बुवा पाटील, चंद्रकांत मुंबईकर चेअरमन इंग्लिश स्कूल वेश्वि, अमृत जोमा पाटील समाजसेवक, रमेशजी मुंबईकर, विजय मुंबईकर, मधुकर मुंबईकर, महाराष्ट्र भूषण राजू मुंबईकर संस्थापक कॉन संस्था, स्नेहल पालकर अध्यक्ष कॉन संस्था, संदेश घरत उपाध्यक्ष कॉन संस्था, संपेश पाटील अध्यक्ष मित्र परिवार, सुरेंद्र पाटील सामाजिक कार्यकर्ता पाले, क्रांती म्हात्रे, अजिंक्य पाटील, माधव म्हात्रे सामाजिक कार्यकर्ते, सुनिल वर्तक प्रसिद्ध निवेदक, आदिवासी बांधव जांभूळ पाडा, कातकरीवाडी वेश्वि वाडीतील आदिवासी बांधव व वेश्वि गावातील गावकरी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचे निवेदन जयदास ठाकरे यांनी तर आभार प्रदर्शन कॉन (केअर ऑफ नेचर) या संस्थेचे उपाध्यक्ष संदेश घरत यांनी केले.

वेश्वी गावात विविध विकासकामांचे उदघाटन झाल्याने वेश्वी गावातील ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# डोळे हे जुलमी गडे...

विधानसभेला नवे अध्यक्ष मिळाले. राहुल नार्वेकर हे सर्वांत तरुण विधानसभा अध्यक्ष १६४ मते मिळवून विजयी झाले. नार्वेकर यांनी आजवर शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप असा प्रवास केल्यामुळे सभागृहात त्यांचे बरेच मित्र आहेत आणि सभागृह चालविणे त्यांना सोपे जाऊ शकते. ही निवडणूक खेळीमेळीत पार पडली. भाजप, शिंदे–सेना आणि अपक्ष यांच्याकडे स्पष्ट बहुमत असल्याचे आता सिद्ध झाले आहे. त्यामुळे, आज–सोमवारी मांडला जाणारा विश्वासदर्शक ठराव ही औपचारिकता ठरली आहे. कोणताही नवा कलह न होता हा ठरावही शांततेत पार पडावा. अध्यक्षांच्या निवडीनंतर बोलताना अनेक सदस्यांनी सीमा ओलांडून टोलेबाजी केली. त्यात अजित पवार प्रमुख होते. स्वत: मुख्यमंत्र्यांनी भाषण अभिनंदनापुरते मर्यादित ठेवले नाही. आज सभागृहात भाषणांचा जो धमाका होणार आहे, त्याची ही चुणूक होती. छगन भुजबळांनी मध्येच सोशल मिडियावरचा विनोद वाचून दाखविणे, हा तर औचित्यभंगच होता. आदित्य ठाकरे यांनी 'आपले जुने मित्र' राहुल नार्वेकर यांचे अभिनंदन करताना 'डोळ्यांत डोळे घालून' सत्ताधारी पाहात नसल्याचे म्हटले आणि नंतर शिवसेनेतील फुटिरांची नैतिक परीक्षा झाली; असाही शेरा मारला. याचा अर्थ, शिवसेनेने विधानसभेत शिंदे सरकार बहुमतात आहे, ही 'दगडावरची रेघ' मान्य केली आहे. नैतिकतेची भाषा संदिग्ध व सापेक्ष असते. तिने वस्तुस्थितीत फरक पडत नाही. मात्र, शिवसेनेच्या दोन्ही गटांच्या प्रतोदांनी व्हिप म्हणजे पक्षादेश काढले होते. मतदानाचे आकडे पाहता हे दोन्ही पक्षादेश अनेक सदस्यांनी धुडकावले. आता ही लढाई तीन पातळीवर लढली जाईल. पहिली लढाई, विधानसभा अध्यक्षांच्या अखत्यारीत. नार्वेकर हे कायदेतज्ज्ञ असल्याचे कौतुक रविवारी झाले. तेव्हा त्यांना हा पक्षादेशाचा आणि त्या अनुषंगाने येणारा शिवसेनेतील फुटीचा मुद्दा हाताळावा लागेल. सभागृहातील बलाबल पाहता, अध्यक्षांच्या कौलाचा अंदाज येऊ शकतो. ही दुसरी लढाई न्यायालयात जाईल. तिची सुरूवातही झाली आहे. तिसरी लढाई, निवडणूक आयोगाच्या व्यासपीठावर होईल. तेथे शिवसेना या पक्षाचे निवडणूक चिन्ह आणि पक्षाच्या घटनेला अनुसरून इतर काही मुद्दे येतील. ही सारी लढाई दीर्घ काळ चालू शकते. त्याचवेळी, राज्यातला व विशेषत: महामुंबईतील मैदानातला शिवसैनिक काय ठरवतो, यावरही दोन्ही गटांचे पुढचे राजकारण अवलंबून आहे. या साऱ्या प्रक्रियेतला पहिला टप्पा विधानसभा अध्यक्षांच्या निवडीने ओलांडला गेला. तो टप्पा एकनाथ शिंदे यांच्या गटाने जिंकला आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या प्रतोदांनी उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांना तर शिंदे गटाच्या प्रतोदांनी नवे अध्यक्ष नार्वेकर यांना पक्षादेशाचे पत्र दिले. या दोन्ही पत्रांची दखल घेऊन अध्यक्ष आता काय निर्णय देतात, हे पाहावे लागेल. शिंदे गटाकडे दोन तृतीयांश आमदार आहेत. त्यामुळे शिवसेना विधिमंडळ पक्षातील फूट मान्य झाली तर या दोन व्हिपबद्दल अध्यक्षांना निर्णय द्यावा लागेल. शिवसेनेच्या ठाकरे गटाचे प्रतोद सुनील प्रभू यांचा पक्षादेश सर्व ५५ सदस्यांनी पाळणे आवश्यक होता, असा दावा ज्येष्ठ आमदार भास्कर जाधव यांनी केला आहे. मात्र, ही निवडणूक झाल्यानंतर सर्वपक्षीय नेत्यांनी व आमदारांनी नार्वेकर यांच्या अभिनंदनाची जी भाषणे केली, त्यांतून या प्रक्रियेवरचा असंतोष दिसत नव्हता. राष्ट्रवादी व काँग्रेसच्या नेत्यांच्या भाषणांमध्ये तर तो बिलकुलच उमटत नव्हता. उलट, नार्वेकर यांना आता निम्माच म्हणजे अडीच वर्षांचा काळ मिळतो आहे, असे काही आमदार म्हणाले. याचा अर्थ, महाराष्ट्र विकास आघाडीतील हे दोन पक्ष या लढाईत शिवसेनेच्या ठाकरे गटाबरोबर असतीलच, याची काहीही खात्री नाही. त्यांच्या दृष्टीने हा विषय संपलेला असू शकतो. 'तुमच्या पक्षाचे आमदार तुम्हाला सांभाळता आले नाहीत आणि आता या तांत्रिक व कायदेशीर लढायांना कितपत अर्थ आहे?' ही आघाडीतील काही नेत्यांची भावना चूक नाही. या पार्श्वभूमीवर, आजचा विश्वास ठराव ही औपचारिकता उरली असली तर मुख्यमंत्र्यांसहित सर्व नेत्यांनी भाषणे करताना संयम पाळणे आवश्यक आहे. 'डोळे हे जुलमी गडे, रोखुनि मज पाहू नका,' इतका राग व्यक्त करण्याची गरज नसली तरी परस्परांकडे पाहण्यास आणि हातात हात घेण्यास काही हरकत नाही. पुढची अडीच वर्षे एकत्र काढायची असतील तर आदित्य ठाकरे म्हणतात तसा 'डोळ्याला डोळा' जरूर द्यावा. याबाबत काँग्रेसचा आदर्श भाजप व दोन्ही सेनांनी घ्यायला हवा. बॅ. ए. आर. अंतुले यांचे काँग्रेस सरकार १९८० मध्ये असताना शरद पवार यांचा समाजवादी पक्ष सरकारला सहकार्य करीत नाही, अशी तक्रार सत्ताधारी करीत होते. तेव्हा, 'आमचे ५२ आमदार तुम्हाला दिले. आणखी किती सहकार्य करू?' असा मार्मिक, दिलखुलास शेरा तेव्हाच्या पक्षांतराला अनुलक्षून पवारांनी मारला होता. हे दिलदारीचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून राज्याचे राजकारण सर्वांनी पुढे न्यावे.

# मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणात सर्व्हिस रोडचा 'ड्रेनेज कम फुटपाथ' फक्त दोन फूट रुंदीचा

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर पोलादपूर शहरातील महामार्ग अंडरपासच्या खंदकातून बॉक्स कटींग भुमिगत स्वरूपाचा एका मार्गिकेवरून सुरू होऊनही अद्याप पृष्ठभागावरून सर्व्हिस रोड कसा न्यायचा आणि 'ड्रेनेज कम फुटपाथ'कसा असावा, याबाबत नॅशनल हायवे ऑथॉरिटी ऑफ इंडियामार्फत आराखड्यामध्ये दिलेले निर्देश 'एलॲण्डटी'ठेकेदार कंपनीकडून दूर्लक्षित करण्यात आले असून पश्चिमेकडील सर्व्हिसरोडची लांबी कमी असताना 'ड्रेनेज कम फुटपाथ'ची फक्त दोन फूट ठेवण्यात आल्याने आराखड्याची 'ऐसीकी तैसी' झाल्याने पोलादपूरकरांचे भवितव्य पूर्णपणे धोक्यात आले आहे.

पोलादपूर शहरातील चौपदरीकरणाबाबत सुरूवातीपासूनच प्रशासन आणि 'एलॲण्डटी'ठेकेदार कंपनीकडून काहीसे ढिसाळ धोरण अवलंबिण्यात आले असून मोबदला घेऊनही ताबा न सोडल्याने पश्चिमेकडील सर्व्हिसरोडचे काम आजमितीस मुर्त स्वरूपात आले नसल्याचे दिसून येत नाही. पोलादपूरच्या पश्चिमेकडील सर्व्हिसरोड आणि त्यावरील ड्रेनेज कम फूटपाथचे काम अद्याप सुरू झाले नसून त्या सर्व्हिसरोडची रूंदी ७.५० मीटर्स तर लांबी १०८० मीटर्स तर ड्रेनेज कम फूटपाथची रूंदी १.५ मीटर्स असल्याचे राष्ट्रीय महामार्गाच्या अंतिम आराखड्यामध्ये नमूद करण्यात आले आहे. पोलादपूर शहरा–तील ग्रामीण रूग्णालयासह पार्टेकोंडपर्यंत सर्व्हिसरोड व ड्रेनेज कम फुटपाथ असूनही प्रभातनगरपर्यंतच पश्चिमेकडील सर्व्हिसरोड दिसून येत आहे. पोलादपूर घाटेआवाड येथे आराखड्यानुसार ड्रेनेज कम फूटपाथची रूंदी १.५ मीटर्स असण्याऐवजी केवळ दोन फूट असलेली दिसून येत आहे.

पुर्वेकडील सर्व्हिस रोडपासून पश्चिमेकडील सर्व्हिसरोडपर्यंत जाण्यासाठी केवळ एकाच व्हेईकल ब्रिजची तरतूद असताना 'एलॲण्डटी'ठेकेदार कंपनीने आणखी चार व्हेईकल ब्रिज उभारल्याने त्या पुलांचा आराखड्यात समावेश करावा लागला. याखेरिज, 'एलॲण्डटी'ठेकेदार कंपनीने रयत शिक्षण संस्थेच्या एस.टी. स्थानकालगतच्या इमारतीपर्यंतच्या पुर्वेकडील सर्व्हिसरोडलगत बांधलेली काँक्रीटची संरक्षकभिंत ही देखील आराखड्यामध्ये समाविष्ट नव्हती. पोलादपूरच्या पूर्वेकडील सर्व्हिस रोडची रूंदी ७.५० मीटर्स तर लांबी ८५० मीटर्स तर ड्रेनेज कम फूटपाथची रूंदी १.५ मीटर्स असूनही या ड्रेनेज कम फूटपाथलगत इमारतींचे बांधकाम झाले आहे.

पोलादपूर शहरात मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरण आणि सर्व्हिसरोड तसेच ड्रेनेज कम फूटपाथच्या कामाबाबत प्रशासन, 'एलॲण्डटी'ठेकेदार कंपनी आणि स्थानिक महामार्गबाधितांचा ताळमेळ नाही की मिलीभगत आहे, याबाबत निश्चित असे उत्तर प्राप्त होत नसून या अनागोंदी कारभारामुळे पोलादपूर शहर पुर्वी मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गालगत होते ते महामार्ग भुमिगत गेल्याने अधांतरी झाल्याचे दिसून येत आहे.



# काँग्रेसच्या सहकार विभागाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी मल्लिनाथ गायकवाड यांची नियुक्ती



**दै.रायगड नगरी । पनवेल**

काँग्रेस पक्ष्याच्या सहकार विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे विद्यमान सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. दादरच्या टिळक भवनात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या हस्ते व सहकार विभागाच्या महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा सौ. शुभांगी शेरेकर यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्रांचे नुकतेच वाटप करण्यात आले.

मल्लिनाथ गायकवाड हे एक अभ्यासू व्यक्तिमत्व असून सहकार क्षेत्रातील सहकारी गृहनिर्माण संस्थाची नोंदणी, कॉन्व्हयन्स डीड, सदनिकांचे सिडको हसतांतरण ई. कामात गेली सुमारे २०/२२ वर्षे त्यांनी काम केलेले असल्याने पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष आर. सी. घरत यांनी त्यांची शिफारस प्रदेश अध्यक्षा शुभांगी शेरेकर यांच्याकडे केली होती, त्याला प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी मान्यता दिल्यानंतर ही नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांच्या या निवडीचा भविष्यकाळात काँग्रेस पक्षाला निश्चितच फायदा होईल असा विश्वास जिल्हा अध्यक्ष आर. सी. घरत यांनी त्यांचे अभिनंदन करतांना व्यक्त केला आहे. त्याच बरोबर पनवेल शहर सहकार विभागाच्या जिल्हा अध्यक्ष म्हणून अरुण कुंभार व प्रदेश सरचिटणीस म्हणून ज्येष्ठ नेते जी. आर. पाटील यांच्याही नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. मल्लिनाथ गायकवाड यांच्या निवडीचे सर्वच स्तरातील काँग्रेस कार्यकर्त्यांनी स्वागत केले असून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

# आपत्ती व्यवस्थापनासाठी माथेरान नगरपरिषद सज्ज

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान पर्यटनस्थळ हे समुद्र सपाटीपासून ९२७ मीटर उंचीवर असल्याने इथे मोठया प्रमाणावर पर्जन्यवृष्टी होत असते. अतिवृष्टीमुळे अनेकदा झाडांची पडझड होऊन वित्तहानी होण्याचे प्रमाण पावसाळ्यात खूपच असते त्यामुळे दरवर्षी पावसाळ्यात नगरपरिषदेच्या माध्यमातून कड्यालागत असणाऱ्या झोपडपट्टी भागाला सूचना देऊन सतर्कता राखण्यासाठी आ–वाहन करण्यात येत असते. त्यातच पुढील ४ दिवस भारतीय हवामान विभागाने, अतिवृष्टीचा इशारा रायगड जिल्ह्याला दिला असून, सकाळपासून जोरदार पाऊस सुरु आहे, तरी सर्व माथेरान वासियांना स्थानिक प्रशासनाच्या वतीने प्रशासक सुरेखा भणगे यांनी विनंती केली आहे की, कोणीही अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, झाडाखाली थांबू नये, अत्यावशक वस्तूंचा पुरेसा साठा घरी असावा.

कोणत्याही प्रसंगी नगरपरिषद प्रशासन आपल्या सोबत आहे. नगरपरिषद कार्यालय, हॉस्पिटल, आणि सर्व टीम आपल्यासाठी सज्ज असून, आपण माथेरान गिरीस्थान नगरपरिषद येथील आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी त्वरित संपर्क साधावा. आपण सर्वांनी सतर्क राहुयात आणि एकमेकांना साथ देऊयात. महसूल यंत्रणा, स्थानिक पोलीस प्रशासन, पलिका प्रशासन, आपल्या सोबत आहे.



# रेल्वे प्रवासात महिला पोलिसांच्या मोबाईलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथे राहणाऱ्या एका महिला पोलिसांच्या मोबाईलची चोरी झाल्याची घटना रेल्वे प्रवासा दरम्यान घडली आहे.

अर्चना डोंबाळे या पनवेल येथे राहत असून त्या मुंबई पोलीस दलात कार्यरत आहेत. त्या कुर्ला येथून रेल्वे ने पनवेल येथे घरी परतत असताना प्रवासा दरम्यान अज्ञात चोरट्याने त्यांच्या मोबाईलची चोरी केली आहे.

# १०० झाडांची लागवड करीत त्यांचे जतन करण्याची जबाबदारी परखंदे आदिवासी वाडीतील बांधवांनी घेतली

**दै.रायगड नगरी । खोपोली**

वृक्ष वल्ली आम्हा सोयरे..या उक्तीप्रमाणे परखंदे आदिवासी वाडीतील बांधवांनी पत्रकार हनुमंत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आज १०० जातीची विविध प्रकारच्या वृक्षाच्या रोपांची लागवड केली आहे. या वृक्षलावडीच्या निमित्ताने या आदिवासी बांधवांनी आज लागवड करण्यात आलेल्या वृक्षांच्या झाडांचे योग्य ते जतन व्हावे याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतल्याचे सांगितले.

वृक्ष लागवडीचा कार्यक्रम दरवर्षी ग्राम पंचायत, पंचायत समिती, तहसील कार्यालय, कृषी विभाग तसेच अन्य शासकीय कार्यालयांच्या माध्यमातून पार पाडला जात असतो.मात्र लागवड करण्यात आलेल्या वृक्ष रोपांची जपणूक किंवा योग्य काळजी कोणाकडूनही घेतली जात नसल्याने वृक्ष लागवडीला काही महत्त्व असल्याचे दिसून येत नाही. शासनाचे उद्दिष्ट पार पाडण्यासाठी या सर्व यंत्रणा खोटा बाहू करतांना दिसत असतात असेच दिसून येते. कृषी दिनाच्या निमित्ताने अनेक ग्राम पंचायतीने ग्राम पंचायत फंडातून पैसे खर्च करून झाडे खरेदी करून लागवडीसाठी आण–लेली आहेत. या झाडांची लागवड होईलच असे नाही. मागील कित्येक वर्षी या झाडांची रोपे ग्राम पंचायतीच्या कार्यालया शेजारी कुजून गेलेले विदारक चित्र पहायला मिळाले आहे. असाच प्रकार याहि वर्षी होणार नाही याची कोणीही खात्री देणार नाही.

आम्हाला आमच्या गावातील रहिवासी असलेले पत्रकार हनुमंत मोरे यांचे वारंवार योग्य ते मार्गदर्शन होत असते.सहकार्य म्हणजे नेमके काय?याचा अर्थ त्यांच्या सेवाभावी वृत्तीतून आम्हाला समजला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्व आदिवासी बांधव नव्या संकल्पनेतून उद्याची प्रगती साधण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

सर्वप्रथम वृक्ष लागवडीचे महत्व त्यांनी आम्हाला पटवून दिल्याने आज आम्ही होराळे ग्राम पंचायत व पत्रकार हनुमंत मोरे यांनी स्वखर्चाने आणलेल्या १०० झाडांची लागवड परखंदे आदिवासी वाडीला जोडणाऱ्या रस्त्यालगत केलेली आहे. यापुढे आम्ही त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक योजनांची अम्मलबजावणी करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## पर्यटन स्थळांच्या ठिकाणी कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश

सुरक्षिततेसाठी जबाबदारी लक्षात घेता फौजदारी प्रक्रिया संहीताचे कलम १४४ प्रमाणे प्रतिबंधीत करण्यात आलेले आहे.

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील गाढेश्वर, (देहरंग) मोरबे ही धरणे तसेच वारदोली धबधबा, कुंडी धबधबा (अर्पिता फार्म हाऊस जवळील धबधबा), हरिग्राम नदीपात्र, धोदाणी नदीपात्र, चिंध्रण व मोहदर नदीपात्र, शांतीवन नदीपात्र, माची प्रबळ, कर्नाळा अभयारण्य या पावसाळी पर्यटन स्थळांचे ठिकाणी पर्यटकांना भेटी देण्याबाबत ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत प्रतिबंधित करण्यात आले आहे. सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे, यानी तसे आदेश दिलेले आहेत.

पावसाचा व वाहत्या पाण्याचा अंदाज न आल्याने पर्यटक पाण्यात वाहून जाऊन अनेकांचा नाहक जीव जातो तर कित्येक जण जखमी होतात. हे टाळण्यासाठी पनवेल तालुका पोलीस स्टेशनच्या माध्यमातून वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी मार्गदर्शनपर सुचना फलके अश्या ठिकाणी उभारले आहेत.

## हिरकणी गावाच्या सर्वांगीण विकासासाठी २१ कोटी रुपयांचा निधी देणार

समन्यायाने वागणूक देणार असून सर्वांच्या विकासासाठी हे शासन काम करेल. राज्यातील सर्व प्रलंबित प्रकल्पांची कामे मार्गी लावण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणार असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांचा सच्चा सैनिक म्हणून मी काम करणार आहे. जनसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी तत्काळ निर्णय घेवून सर्वसामान्यांची कामे लवकर होण्यासाठी आमचे सरकार भर देणार असून महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी अहोरात्र प्रयत्न करणार आहोत.

## विविध मागण्यांसाठी तहसील कार्यालयात धरणे आंदोलन

खाद्यतेले, डाळी देण्यात याव्यात. एल पी जी गॅस सिलेंडर विक्री नोंदणी करून परवानगी देऊन निश्चित कमीशन द्यावे. केंद्र सरकारने वाढवलेले २०/– व ३७/– कमिशन रक्कम राज्य सरकारने तात्काळ अमलांत आणावी. कोरोना महामारी काळात शासनाने कोणतेही सुरक्षा कवच न देता रेशन वाटप केले त्यात मृत्यूमुखी पडलेल्या परवाना धारकांना कुटुंबात ठराविक मदत घोषित करून कोरोना योध्दा घोषित करावे. तांदूळ गव्हाची गोणी बारदानात भरून देऊन प्लास्टिक गोणी बंद करण्या बाबत केंद्र सरकारने आदेश काढून भारतीय खाद्य निगमला निर्देश द्यावे. या आणी ईतर प्रमुख मागण्यांसाठी निवेदन सादर केले.

# तारा, कर्नाळा अभयारण्य, चिंचवण, व पळस्पे सर्व्हिस रोडवर पथदिवे लावा : आ.महेश बालदी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तारा, कर्नाळा अभयारण्य, चिंचवण, व पळस्पे सर्व्हिस रोडवर पथदिवे लावण्यात यावेत, अशी मागणी आमदार महेश बालदी यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण प्रकल्प अंमलबजावणी युनिट पनवेल प्रकल्प संचालक श्री. घोटकर यांच्याकडे केली आहे.



या संदर्भात आमदार महेश बालदी यांच्या मागणीचे पत्र कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजू पाटील, माजी उपसरपंच विद्याधर जोशी यांनी संबंधित अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केले. आमदार महेश बालदी यांनी केलेल्या मागणीतील पत्रात म्हंटले आहे कि, तारा, कर्नाळा अभयारण्य, चिंचवण, व पळस्पे या सर्व्हिस रोडवर स्थानिक ग्रामस्थांचे धार्मिक पालखी सोहळा त्या रस्त्यांच्या मार्गाने क्रमण होत असते, तसेच रात्रीच्या वेळी अंधारात वाहनचालकांना वाहतूक करण्यास फार गैरसोय होत असते. अंधारामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे या ठिकाणी दोन्ही बाजूस स्ट्रीट लाईट बसविण्यात यावे व तशी तातडीने कार्यवाही व्हावी, असेही त्यांनी नमूद केले आहे.

Gunnal Saheb Court
Adv. Meghana Nimbalkar

**PUBLIC NOTICE**

IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.)
PANVEL AT PANVEL

M.A. NO. 966/2022
Exh. No. 8/D
N.D. 08/08/2022

1. Mrs. Rajani Rajeshwar Kotwal
Age. 82 Years, Occupation : Nil
2. Apurva Arun Kotwal
Age 53 Years , Occupation
3. Miss. Sayali Arun Kotwal
Age. 27 Years, Occupation
4. Abhishek Arun Kotwal
Age. 24 Years, Occupation
All R/ at Flat No. A/104,
Vaibhavshali CHS., Plot. 05,
Sector – 11, Kharghar 410210 Applicants

That late Mr. Arun Rajeshwar Kotwal was the son of applicant no. 1 & husband of applicant no. 02 & father of applicant no. 03 & 4 who expired on 05/10/2020 at K. J. Somaiya Hospital. The Property Description standing in the name of deceased is Attached herewith

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

**Name of the property Holder : Late Mr. Arun Rajeshwar Kotwal & Mrs. Apurva Arun Kotwal**

**1. Flat No. A/104, On 1ST floor , 'A' Wing Vaibhavshali CHS., Plot. 05, Sector – 11, Kharghar 410210 , Tal. Panvel & Dist – Raigad**
**Agreement Value Rs. 40,00,000/- (Rupees Forty Lakhs Only)**
**( For 50% Share)**

**2. Flat No. 402 on 4TH Floor , building name GOVIND CHHAYA, Plot no. 30, Navade Phase 2, Tal – Panvel & Dist – Raigad**
**Agreement Value Rs. 31,21,000/- (Rupees Thirty One Lakhas Twenty One Thousand Only)**
**( For 50% Share)**

Whereas the above named applicants have filed present misc. application for heirship certificate under Bombay Regulation VIII of 1827, the court of civil judge (S.D.) Panvel.

You the member of public are hereby given notice to appear in the court of civil judge (S.D.) Panvel in the person or pleader duly instructed and to file your say / objections if any notice within 30 days from the date of publication of public notice, Failing which the said application will be held presuming that there is no objection from anybody and the application will be finally decided.

Given under the hands and seal of the court this 02 day of july 2022

Sd/- Jr. Clerk C.C.S.D. Panvel — Court Seal — Sd/- Asst.Superitendent C.C.S.D. Panvel

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

# गटार सेल्फी पॉईंट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे प्रभाग १७ मधील तुंबलेली गटार, रस्त्यावर घाण पाणी यावर सिडको विभागास वारंवार तक्रारी, निवेदन देऊन ही गटार लाईन तुंबणे हा त्रास काही कमी होत नाही.

या विरोधात प्रातिनिधिक स्वरूपात सर्व प्रभागातील रहिवाशी मिळून सिडको आणि पालिका यांना जागे करण्यासाठी गटार सेल्फी पॉईंट अशा प्रकारे सेक्टर ६,७,८,९ या ठिकाणी आंदोलन केले.

या प्रतिनिधिक आंदोलनात अनंत वारे, राहुल यमगर्णी, अमोल शितोळे, चंद्रकांत खिलारी, अमोल बोडखे, विलास खरोटमोल, महेन्द्र पाटील, दिलीप तांबे, शंकर म्हात्रे, अनंत वेलुंडे, चंद्रकांत पावसे, अनिल गोलाने, अजिंक्य पौल, योगेश चौघुले, योगेश दशरे, दशरथ पाटील, तानाजी कांबळे,व प्रभागातील विविध सोसायटी मधील जास्तीत जास्त नागरिकानी सहभागी होऊन सिडको प्रशासन यांचा निषेध नोंदवला.

# पनवेलमध्ये दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी भरारी 2022 करिअर मार्गदर्शन शिबिर व गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एमकेसीएल अर्थात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित रायगड विभाग आयोजित दहावी, बारावी व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिर भरारी २०२२ - तुमच्या करिअरला द्या एक परिपूर्ण भरारी गुरुवार, दि. ७ जुलै २०२२ रोजी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे, सकाळी ९.३० ते दुपारी २ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे.

दहावी, बारावी व महाविद्यालयीन विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्याकरिता पनवेल तालुक्यातील सर्व एमएस-सीआयटी केंद्रांच्या माध्यमातून विनाशुल्क आयोजित केलेले आहे. अशी माहिती 'एमकेसीएल'चे कोंकण विभागीय समन्वयक जयंत भगत यांनी दिली आहे. या शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिका आयुक्त गणेश देशमुख, सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत उपस्थित राहणार आहेत.

महाराष्ट्र राज्यातील नामवंत शिवव्याखाते, लेखक व करीअर मार्गदर्शक प्रशांत देशमुख हे विद्यार्थ्यांना या निमित्ताने मार्गदर्शन करणार आ-हेत. झी चोवीस तास या वृत्तवाहिनीवर पासवर्ड आनंदाचा या कार्यक्रमातून विविध व्याख्याने देणारे, स्टार प्रवाह या वाहिनीवरील राजा शिव छत्रपती, शिवधनुष्य या ऐतिहासिक कार्यक्रमात इतिहास अभ्यासक म्हणून सहभाग, डीएमई (डिप्लोमा इन मकॅनिकल इंजिनिअर), तसेच कला शाखेत एमए (मराठी), शिवचरित्रावरील ते गाढे अभ्यासक आहेत. आतापर्यंत राज्यस्तरावरील २०० पेक्षा जास्त वत्कृत्व, वादविवाद, कथाकथन स्पर्धेमध्ये यश, जय शिवराय, गुड मॉर्निंग या पुस्तकाचे लेखक, प्रेरणादायी व्याख्याते यांचे अत्यंत प्रभावशाली व्याख्यान विद्यार्थ्यांना अनुभवता येणार आहे.

एमकेसीएलचे वरिष्ठ व्यवस्थापक दिपक पाटेकर हे प्रत्यक्ष कार्यानुभवातून पदवी कशी मिळवावी यासंदर्भात मार्गदर्शन करणार आहेत. बीबीए पासून ते बीएस्सी कम्प्युटर सायन्स या पदव्या देखील आपण काम करता-करता कशा मिळवू शकतो यासंदर्भात कमवा आणि शिका तसेच एमकेसीएलचे जॉब स्कील कोर्से (क्लिक कोर्स) या बद्दल आपल्याला माहिती कळू शकेल. तसेच दहावी व बारावीच्या विद्यार्थांचा गुणगौरव सोहळा मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. सध्याच्या युगामध्ये डिजिटल स्किल्स फार महत्वाचे आहेत. एमकेसीएल च्या माध्यमातून एमएससीआयटी बरोबरच एकविसाव्या शतकामध्ये आवश्यक असलेल्या अत्याधुनिक डिजिटल स्कीलच्या अशाप्रकारे दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विविध विषयांवर मोफत मार्गदर्शन करण्याचं काम एमकेसीएलच्या रायगड जिल्ह्यातील सर्व एमएस-सीआयटी आणि क्लिक सेंटरच्या माध्यमातून होत आहे. या शैक्षणिक मेजवानीचा दहावी, बारावी तसेच महाविद्यालयीन सर्व विद्यार्थ्यांनी तसेच त्यांच्या पालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पनवेल - उरण तालुक्यातील सर्व एमएस-सीआयटी आणि क्लिक केंद्राच्या वतीने करण्यात येत आहे.

# हिंद मराठा महासंघ कोकण प्रदेशात झंझावात मोठ्या प्रमाणात समाज बांधव सामील : विनोद चव्हाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हिंद मराठा महासंघ राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले राष्ट्रीय अध्यक्ष उज्वलसिंह राजे गायकवाड राष्ट्रीय सरचिटणीस ड किशोर बांदल देशमुख यांच्या सुचनेनुसार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुधीरराव पालांडे राष्ट्रीय उपाध्यक्ष ऍड आनंदराव भोसले मुंबई प्रदेश अध्यक्ष संजय सावंत यांच्या सूचनेनुसार कोकण प्रदेशाध्यक्ष निवृत सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी कोकण प्रदेश नियुक्त्या जाहीर केल्या

या वेळी बोलताना कोकण प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी सांगितले मुंबई प्रदेश सरचिटणीस पदी निवृत एसीपी मंगेश सावंत तर उत्तर मुंबई जिल्हा उपनगर अध्यक्ष पदी निवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त अनिल फोफले तर पनवेल महानगर पालिका क्षेत्र अध्यक्ष पदी यतिन विनायक देशमुख रायगड जिल्हा उपाध्यक्ष पदी अतुल चव्हाण राजेंद्र जनार्दन भगत पनवेल शहर अध्यक्ष अनिल दामोदर जाधव पनवेल शहर उपाध्यक्ष ( बाबू) जिल्हा सल्लागार पदी चिंतामणी भास्करराव धूरी ( अनंत) यांच्या निवडीला राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले यांनी मान्यता दिली या वेळी गणेश बाबाजी परब कोकण प्रदेश सचिव पदी निवड जाहीर केली आहे. पनवेल येथील निवृत सहाय्यक पोलीस आयुक्त व हिंद मराठा महासंघ कोकण प्रदेश अध्यक्ष विनोदराव चव्हाण यांच्या संपर्क कार्यालयात आज आढावा बैठक आयोजित करण्यात आली त्यात निवडीची घोषणा करण्यात आली एड इंद्रजीत भोसले प्रथमेश भोसले रायगड जिल्हा सरचिटणीस प्रथमेश सावंत राजेश परब आदी मान्यवरांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले असुन पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा सदिच्छा व्यक्त केल्या आहेत.



# प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, विलेपार्लेच्या शिरपेचात मानाचा तुरा

## संकुलाच्या डायव्हिंग खेळाडूंचे राष्ट्रीय स्तरावरील घवघवीत यश

**दै.रायगड नगरी । मुंबई**



नुकत्याच राजकोट येथे पार पडलेल्या ३८ सब जूनियर आणि ४८ ज्युनियर डायव्हिंग नॅशनल चॅम्पियनशिप २०२२ या स्पर्धेमधे छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल, विलेपार्ले च्या खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले. मुलींच्या १८ वर्षा खालील आणि १३ वर्षाखालील गटात महाराष्ट्राच्या संघाने सांघिक विजेतेपद पटकाविले तर मुलांच्या तिन्ही गटात सर्व्हिसेस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्ड च्या संघाने सांघिक विजेतेपदाची ट्रॉफी पटकावली.

या स्पर्धेत महाराष्ट्राला एकूण ५ सुवर्ण पदके, ७ रौप्य पदक आणि ८ कांस्य पदके मिळाली आहे. या खेळातील काही स्पर्धकांनी विशेष कामगिरीने तिथल्य प्रत्येकाचीच मन जिंकून गोल्डन गर्ल आणि गोल्डन बॉय असे किताब मिळवले. या स्पर्धेचे सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राच्या संघात प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलात सराव करणाऱ्या ४ खेळाडूंची निवड झाली होती. संकुलाची क्षमा बंगेरा हीने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत मुलींच्या १८ वर्षा खालील गटात १ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग आणि ३ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग दोन्ही क्रीडा प्रकरात सुवर्ण पदक पटकावले. वयाच्या १२ वर्षा पासून क्षमा हीने संकुलात डायव्हिंग या खेळाचे प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली आणि ५ वर्षांच्या सततच्या प्रयत्नांनी तीने इथ पर्यंत मजल मारली. केया प्रभु हीने मुलींच्य १५ वर्षा खालील गटात १मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग या प्रकारात रौप्य तर हायबोर्ड डायव्हिंग या प्रकारात कांस्य पदक पटकावले. मुलांच्या १८ वर्षाखालील गटात कबीर राव याने १ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग आणि ३ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग या दोन्ही क्रीडा प्रकारात सर्व्हिसेस स्पोर्ट्स कंट्रोल बोर्ड च्य मुलांशी सामना करत कांस्य पदक पटकावले तर स्वराज लाड याने प्रथमच राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होऊन मुलांच्या १३ वर्षा खालील गटात १ मीटर स्प्रिंग बोर्ड डायव्हिंग या प्रकारात कांस्य पदक पटकावले. संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू आणि सचिव डॉ. मोहन अनंत राणे सर यांचे नियमित सहकार्य आणि प्रशिक्षक सायली महाडीक आणि तुषार गितये यांचे मार्गदर्शन यांच्या जोरावर खेळाडूंनी इथपर्यंत मजल मारली.

# चिरनेर बेलडोंगरी येथे जागतिक वन महोत्सवानिमित्त वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । उरण**

१ जूलै ते ७ जूलै २०२२ ह्या जागतिक वन महोत्सव सप्ताहाचे औचित्य साधून वन्यजीव निसर्ग संरक्षण संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या देशी वृक्षारोपण कार्यक्रम हा निसर्गमित्र स्व. आनंद मढवी यांच्या स्मृतींना निसर्गरूपी आदरांजली देण्यासाठी बेलडोंगरीवर विविध जातीच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

यासाठी विविध प्रजातींची देशी रोपांची लागवड करण्यात आली. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून वनविभाग परिमंडळ - १ चे अधिकारी संजय पाटील, उरण वनविभागाचे राजेंद्र पवार, एस. बी. इंगोले हे अधिकारी उपस्थित होते. बेलडोंगरीवरील आत्तापर्यंत केलेल्या प्रत्येक झाडांचे योग्य संगोपन करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष विवेक केणी, काशिनाथ खारपाटील, मनोहर फुंडेकर, मोहन फुंडेकर, नितीन मढवी, राजेश पाटील, विष्णू मोकल, केशव ठाकूर, दिनेश चौलकर, विनीत मढवी, प्रणय परिंगे, बुधाजी पाटील, दिनकर कुंडेगाव, सुरेश म्हात्रे ,महेश मिरगे आदी सदस्यांनी खुप मेहनत घेतली.

या परिसरात लागणारे वणवे रोखण्यासाठी ही संस्था वनविभागाच्या मदतीस नेहमी कार्यतत्पर असते. झाडे लावण्याबरोबर झाडे वाचवणे ह्यासाठी पुढाकार घेणाऱ्या सहभागी संस्थाचे व उपस्थित वृक्षप्रेमींचे अभिनंदन यावेळी वनविभागातर्फे करण्यात आले.सदर कार्यक्रमादरम्यान सर्पमित्रांनी पकडलेली दोन सापांना सुरक्षित निसर्गाच्या सानिध्यात सोडुन देण्यात आले. यावेळी माध्यमिक शिक्षक मनोज पाटील, धनंजय तांबे, वसंत वळकुंडे समिर म्हात्रे, आदी मान्यवर उपस्थित होते.


## PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that my client Mr. Ashok Kumar Pandey and 2) Mrs. Pushpa Ashok Pandey, presently residing at- Flat no. 701 & 702, Bhanu Heights CHS, Plot No- 124, Sector-19, Kharghar, Navi Mumbai, Pin- 410210, have lost/misplaced the '3 sets of original Agreement for sale/sale deed' of the Flat no. 701 & 702, Bhanu Heights CHS, Plot No- 124, Sector-19, Kharghar, Navi Mumbai, Pin- 410210, which are 1) Document serial no. PVL2-8310-2006, dated- 29/12/2006, 2) Document serial no. PVL1-7866-2008, dated- 22/02/2008, and 3) Document serial no. PVL1-02120-2010, dated- 23/02/2010, for flat no. 701, and 1) Document serial no. PVL2-8309-2006, dated- 29/12/2006, 2) Document serial no. PVL1-7867-2008, dated- 22/02/2008, and 3) Document serial no. PVL1-02124-2010, dated- 23/02/2010, for flat no. 702, at some where in Kharghar, Navi Mumbai, and whch are duly registered at their respective jurisdiction of sub registrar offices at Panvel. It is humbl request If any person/s found the said 'Original Agreement for sale/sale deed' please returne it to my office address or my client's residence address given above within 7 days from the date of publication hereof, otherwise the application for duplicate 'Agreement for sale/sale deed' have to move to the concern sub registrar office by my client. My office address given herein below.
Place: Kharghar, Navi Mumbai,
Date: 03-07-2022.

**SD/-**
**Adv. Yogendra L. Dubey**
**(Advocate High Court)**
**Office no. 06, Phenix Residency, Plot No. 64, Sector- 20, Kharghar, Navi Mumbai, Pin- 410210. Mob- 9820668773**



मा.पांडे साहेब कोर्ट
**अर्जदाराचे वकील : ॲड.दिनेश पाटील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.७२६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२८/०७/२०२२

श्री.गोविंद नामदेव पाटील
वय : ६५ वर्षे, धंदा : शेती
रा.तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
पनवेल महानगरपालिका
(नावडे विभाग)
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सदरचा अर्जदार हा मौजे : तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमस्वरुपी रहिवाशी आहे. अर्जदार यांचे आजोबा कै.मुका गोविंद पाटील यांचा मृत्यू दि.१०/११/१९४४ रोजी मु.तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधानाने अर्जदार यांचे आजोबांच्या मृत्यूची नोंद केलेली नाही. तसेच आज रोजी अर्जदार यांचे आजोबांच्या मृत्यूची नोंद असलेले लेखे कुठेही नाही तसा पनवेल महानगरपालिका (विभाग नावडे), ता.पनवेल, जि.रायगड मधून अर्जददार यांचे आजोबांच्या मृत्यूची नोंद नसल्याचा दाखला देण्यात आलेला आहे.

सबब अर्जदार यांनी सदरचा जन्म मृत्यू नोंदणी कायदा १९६९ कलम १३ (३) प्रमाणे मे.कोर्टात फौजदारी चौकशी अर्ज नं.७२६/२०२२ दाखल केल आहे. सबब सदरचा जन्म नोंदणी बाबत कै.मुका गोविंद पाटील मृत्यू दि.१०/११/१९४४ बाबत कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांचे आजोबांचा दि.१०/११/१९४४ मृत्यू नोंदीबाबत सर्टीफिकेट/प्रमाणपत्र मे.कोर्टातून देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ०४/०७/२०२२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का
**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, पनवेल**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत श्री.सुरज रामचंद्र भोरकडे व श्री.रामचंद्र किर्तप्पा भोरकडे यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देण्यात येत आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यारपत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्यावर येवून खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणार नाही.

**परिशिष्ट** : तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका : उरण, मे.दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा : रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे : पिरकोन, येथील मिळकत भूमापन/सर्व्हे नं.१६५/३/अ (जुना स.नं.९/३अ) यांसी एकूण क्षेत्र ०० हेक्टर १३ आर ७० प्रति, व पोटखराबा ०० हेक्टर ०२ आर ६० प्रति, यांसी आकार रक्कम रुपये १.३२ पैसे, यांसी चतुःसिमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त.
रायगड, तारीख ५ जुलै २०२२

**सही/-**
**श्री.विनायक ताम्हणकर, वकील**
**खरेदीदारातर्फे वकील**
**३०२, जय आशापूरा रेसिडेन्सी,**
**शनी नगर, मांजर्ली, बदलापूर (प.) ४२१५०३**
**भ्रमणध्वनी क्र.८६६८५५१३१२**



मा.गोडसे सो
**वारसाचे सर्टीफिकेटबद्दल जाहीर नोटीस**
**ॲड.मानस मोहंती व**
**ॲड.योगिनी भराडे-मोहंती**
**अर्जदार यांचे वकील**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.८८१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२२/०८/२०२२

१) श्री.सुषमा छबुराव पाटील
वाइफ ऑफ विनोद रमेश तांबोळी
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्री.प्रथम विनोद तांबोळी
वय : २० वर्षे, धंदा : छात्र
वरील सर्व रा.रुम नं.२०२, पारस धाम,
प्लॉट नं.३१, सेक्टर नं.१३,
खांदा कॉलनी, न्यू पनवेल-४१०२०६ — अर्जदार
विरुद्ध
निरंक — सामनेवाला

वरील अर्जदार १ यांचे पती व २ यांचे वडील कै.श्री.विनोद रमेश तांबोळी यांचे दि.०२/११/२०१९ रोजी ५०४, वामा पॅराडाईज, सेक्टर नं.१३, खांदा कॉलनी, न्यू पनवेल, पनवेल नवी मुंबई-४१०२०६ येथे निधन झाले. यांच्या मालकीचे असलेले मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मालमत्तेचे वर्णन**

**फ्लॅट नं.५०४, पाचवा मजला, वामा पॅराडाईज, प्लॉट नं.३/ए, सेक्टर नं.१३, खांदा कॉलनी, न्यू पनवेल, नवी मुंबई-४१०२०६, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र, क्षेत्रफळ ४५.५५५ चौ.मी. कारपेट एरिया + ९.२४० चौ.मी. टेरेस एरिया + ८.९९८ चौ.मी. कप बोर्ड एरिया.**

**फ्लॅट नं.२०२, दुसरा मजला, पारस धाम, प्लॉट नं.३१, सेक्टर नं.१३, खांदा कॉलनी, न्यू पनवेल, नवी मुंबई-४१०२०६, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, महाराष्ट्र, क्षेत्रफळ ४१.३६ चौ.मी. बिल्टअप एरिया.**

वरील मिळकतीबाबत अर्जदाराने वारस दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसांचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदाराच्या विनंती प्रमाणे वारस दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.४ जुलै २०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.सोनावणे साहेब यांचे कोर्टात
**ॲड.प्रदीप भोईर**

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.८६२/२०२२
ने.ता.२६/०८/२०२२

१) श्री.सुलोचना जनार्दन उलवेकर
वय : ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.आकाश जनार्दन उलवेकर
वय : २९ वर्षे, धंदा : नोकरी
३) श्री.विनायक जनार्दन उलवेकर
वय : २५ वर्षे, धंदा : नोकरी
सर्व रा.खिडूकपाडा, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
श्री.केशव तुळशीराम उलवेकर
वय : ५३ वर्षे, धंदा : शेती
रा.खिडूकपाडा, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र.१ यांची सासू, अर्जदार क्र.२ व ३ यांचे आजोबा व सामनेवाला यांची आई कमळाबाई तुळशीराम उलवेकर या दि.१५/०२/२०२२ रोजी मयत झाल्या आहेत. मृत्यूसमयी मयत कमळाबाई तुळशीराम उलवेकर यांचे नावे व सामाईक हिश्श्यात असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : अंबेतखार व रोडपाली, ता.पनवेल, जि.रायगड**

| | यु.के.नं. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | अंबेतखार-१ | १६+१७ to ७९+१३० to १४१+१४७<br>४३८ | ११४ | ०-३५-४ | १.६९ |
| २ | अंबेतखार-१ | १६+१७ to ७९+१३० to १४१+१४७<br>४३८ | १२० | ०-५७-० | १.८४ |
| ३ | अंबेतखार-१७ (A) | १६+१७ to ७९+१३० to १४१+१४७<br>४३८ | ८ (पै) | ०-५१-१ | ६.६३ |
| ४ | अंबेतखार-१७ (A) | १६+१७ to ७९+१३० to १४१+१४७<br>४३८ | १४ (पै) | १-११-२ | १५.८५ |
| ५ | अंबेतखार-२५ (A) | १६+१७ to ७९+१३० to १४१+१४७<br>४३८ | ११० (पै) | ०-१५-४ | ४.२० |
| ६ | अंबेतखार-२५ (A) | १६+१७ to ७९+१३० to १४१+१४७<br>४३८ | ७१ | ०-४२-५ | २.०० |
| ७ | रोडपाली-५७ | ३४१ | ० | ०-०५-१ | ०.३७ |
| ८ | अंबेतखार-२५ (B) | १+२ to १५+८० to १२९+१४२ to १४६<br>४३७ | ७६ (पै) | ०-२२-० | ३.४४ |
| ९ | रोडपाली-१ | २१७ | ० | ०-०६-० | ०.८२ |

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज अर्जदार व सामनेवाला हे मयत कमळाबाई तुळशीराम उलवेकर यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.१८/०६/२०२२ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## धुक्यात हरवले माथेरान



**दै.रायगड नगरी । माथेरान**

गर्द झाडीतील दाट धुक्यामुळे जणूकाही अवकाशात तर आलो नाहीत ना असा भास वर्षाऋतूंत माथेरान मध्ये आल्याशिवाय अनुभवता येत नाही. अंगाला सुखद गारवा अन वातानुकूलित वातावरणात रिमझिम पावसात ओलेचिंब भिजण्याची मजा काही औरच असते. एखाद्या पॉईंट वरून नयनरम्य देखावे आणि झर्‍यांच्या प्रवाहाने फेसाळणारे शुभ्र धबधबे मनाला भुरळ घालतात. कुठेतरी टपरीवर चहा, भजी, मक्याचा आस्वाद घेत पायी भटकंती करतांना मन अगदी प्रफुल्लित होऊन जाते.त्यामुळेच निदान वर्षाऋतूंत माथेरानच्या निसर्गाशी जवळीक साधण्यासाठी एकवेळ भेट देणे गरजेचे आहे.

## कै. वीर वाजेकर शेठ यांच्या ११५ वी जयंतीचे उरणमध्ये आयोजन

**दै.रायगड नगरी । उरण**

मिठागर कामगार यूनियनचे संस्थापक अध्यक्ष, शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते कै. वीर वाजेकर शेठ यांची बुधवार दि ६/७/२०२२ रोजी ११५ वी जयंती आहे.



या जयंती निमित्त बुधवार दि ६/७/२०२२ रोजी सकाळी १० वाजता उरण पेठा मिठागर कामगार संघ कार्यालय कोटनाका उरण , जि. रायगड येथे ज्येष्ठ मान्यवर, चेअरमेन, संचालक यांच्या उपस्थितीत जयंती महोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तरी उरण पेठा मिठागर कामगार संघ, उरण पेठा मिठ उत्पादक सहकारी मंडळ, उरण महाल सहकारी मजूर संघाचे सदस्य पदाधिकारी यांनी तसेच समस्त वाजेकर शेठ प्रेमी यांनी या जयंती महोत्सवास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

**वाचकांना विनम्र सूचना**

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# ८० गावांवर भर पावसाळ्यात ओढवले भीषण पाणी टंचाईचे संकट

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

रायगड जिल्ह्यातील तब्बल ८० गावांना पाणी पुरवठा करणाऱ्या उमटे धरणातील उपयुक्त पाणी साठा संपल्यामुळे नागरिकांना नळाद्वारे पाणी पुरविणे बंद करण्यात आले आहे. त्यामुळे भर पावसाळ्यात येथील ४७ गाव व ३३ नागरिकांना भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागले आहे. पावसाळ्यात महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. तर घराच्या कौलारू पागणी चे पाणी पिण्याची नामुष्की ओढवली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे . येथील गोरगरीब जनतेला वर्षाचे बाराही महिने पाणी विकत घ्यावे लागत आहे, त्यामुळे येथील जनतेत असंतोष उफाळून आला आहे. या पाणी टंचाईचे पडसाद रायगड जिल्हा परिषदेच्या निवडणुकांवर पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



मेलेल्या गुरांसारखा धरणातील पाण्याला उग्र वास येत असल्याने नागरिक संतप्त झालेत. मागील वर्षी धरणातील गाळ काढूनही यावर्षी उमटे धरणांतील पाणी संपल्यामुळे ८० गावांना पाणी टंचाईला समोर जावे लागलें आहे . धरणाची उपयुक्त पाणी साठ्याची क्षमता धरणातील गाळ वाढल्यामुळे कमी झालेली आहे . स्थानिक प्रतिनीधी व शासनाने गेल्या वर्षी गाळ काढण्याचा प्रयत्न केला असला तरी धरण पूर्णपणे गाळमुक्त न झाल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली असल्याने मत जलतज्ञ व्यक्त करीत आहेत . उमटे प्रादेशिक ग्रामीण पाणी पुरवठा योजनेंतर्गत जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा उपविभागाकडून दरवर्षीप्रमाणे पाणी टँकरवर अवलंबून वितरणाबाबत योग्य नियोजन करण्यात येऊन धरणातील पाणीसाठा जुनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत पुरेल याबाबतची खात्री करण्यात आलेली होती . १८ जानेवारी २०२२ पासून उमटे धरणात क्षेत्रांतील ४३ गाव ३३ आदिवासी वाड्यांना एक दिवसाआड पाणीपुरवठा व २३ मे २०२२ पासून दोन दिनसाआड पाणी पुरवठा करण्याची विभागाकडून सुरवात करण्यात आली होती . ०२ जून रोजी पुन्हा पाणी पुरवठा विभागाकडून उमटे धरणाची पाहणी करण्यात आली त्या पाहणीत धरणातील उपलब्ध पाणी साठा संपला असल्याचे वास्तव समोर आले. तसेच दूषित पाणी पुरवठा यामुळे येथील जनतेचे आरोग्य धोक्यात आलेय.

उमटे धरण क्षेत्रातील अनेक गावे भर पावसाच्या हंगामात तहाणलेली दिसत आहेत. सध्या येथील ४३ गावे व ३३ आदिवासी वाडया भीषण पाणी टंचाईचा सामना करीत आहेत, काही ठिकाणी धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्तिती दिसून येत आहे. या पाणीटंचाईला अकार्यक्षम अधिकारी जबाबदार असल्याचा आरोप येथील ग्रामस्थ करीत आहेत. उमटे धरणातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे? उमटे धरण हे मागील सन २०१६-१७ पासून उमटे धरणाचा गाळ काढून धरणाच्या संरक्षण भिंतीची भगदाडे भरावीत यासाठी उमटे धरण क्षेत्रातील ग्रामस्थांनी शासनाला वारंवार विनंती अर्ज दिले. मात्र शासनाने नकारात्मकतेची भूमिका घेवून धरणाचा गाळ न काढता लोकांच्या भावनेची चेष्टाच केली आहे. असे संतप्त ग्रामस्त रर्वीः राकेश पाटील,रर्वी- मधुकर वाजंत्री, नंदेश गावंड, व इतर ग्रामस्थांनी म्हटले. याठिकाणी शासनाच्या जलजीवन मिशनची ऐशी की तैशी झालीय.प्रत्येक नागरिकाला दैनंदिन शुद्ध व मुबलक पाणीपुरवठा करण्याचा शासन आदेश इथं धुळीत मिळालाय. आपल्या समस्या व ज्वलंत पाणी प्रश्नाबाबतीत येथील ग्रामस्त, तरुण संघटीत झाले व जिल्हाधिकारी रायगड , मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद, लोकप्रतिनिधी तसेच मुख्य कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग रायगड जिल्हा परिषद यांना निवेदनाच्या प्रत देण्यात आल्या आहेत. मात्र आजही या धरणाच्या गाळ उपसा व शुद्ध पाणीपुरवठा प्रश्नावर संवेदनशिलता दिसून येत नाही. असंख्य गावांची तहान भागविणारे परंतू भ्रष्टाचाराच्या गाळात रुतलेल उमटे धरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. धरणाची साठवण क्षमता जरी मोठी असली तरी सध्या धरण गाळाने भरलंय, मुबलक आणि स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात यावा,धरणाची डागडुजी तात्काळ करावी अशी मागणी जोर धरत आहे. मागणीची जलद पूर्तता करावी अन्यथा.... इथल्या पाणी प्रश्नावर उग्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थानी दिलाय.

सध्या उमटे धरणाच्या पाण्यावर धरणालगतची ८० गावे अवलंबून आहेत. उमटे धरण हे रायगड जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येते. मात्र राजकीय व शासकीय उदासीनतेमुळे धरणात मागील ४० ते ४५ वर्षांपासून गाळ तसाच साचलेला आहे. उमटे धरणाच्या पाण्यावर अवलंबून असणार्या येथील तरूणाईने दिनांक १ मे २०१९ रोजी तीन वर्षापूर्वी महाराष्ट्र दिनी धरणाचा गाळ काढण्याच्या संदर्भात श्रमदान करून शासनाचा निषेधही नोंदविला होता. शासनाने गाळ काढण्याचे आश्वासन दिले होते.

मात्र आजपावेतो शासनाने घेतलेले निर्णय धुळखात पडत असून गाळ तसाच साचलेला आहे हे दुर्देव आहे. उमटे धरणाचा गाळ यावर्षी तरी आपण युद्धपातळीवर काढाल अशी अपेक्षा ग्रामस्त महिलानी व्यक्त केलीये. धरणाच्या दयनीय अवस्थेची जिल्हा प्रशासनाने पाहणी करुन तात्काळ कारवाई करावी. अशी मागणी जोर धरते आहे. येथील उमटे धरणात गाळ साठला असून सदर धरणातील गाळ काढून धरणाचे खोलीकरण करणे,जकवेल पर्यंत पोहचण्याच्या मार्गाचे व सांडवा मोडकळीस आल्याने त्याचे काम करणे गरजेचे आहे.सदर सविस्तर पाहणी अहवाल साठी नियुक्त तांत्रिक सल्लागार यांनी सर्वेक्षण केले असून अंदाजपत्रक व सविस्तर अहवाल सादर केला असल्याचे पत्र रायगड जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग अभियंता यांनी कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग रायगड जिल्हा परिषद यांना दिलेले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही होत आहे.

# ऑनलाईन वॉशींग मशीन खरेदी करण्याच्या नादात म्हसळयातील तरुणाची तब्बल रु ५४,९९७ झाली फसवणूक


**दै.रायगड नगरी । म्हसळा**

ऑन लाईन वॉशींग मशीन खरेदी करणाऱ्या अ.समद कौचाली रा.तोराडी बंडवाडी या ग्राहकाने कस्टम केअरच्या माध्यमांतून डीलेव्हरी ट्रॅक करताना कुरीअरचा शोध घेता घेता फोन केला असता कौचाली याना रु ५४ हजार ९९७ चा गंडा बसल्याचे त्यांच्या लक्षात आले. घटनेची नोंद अ.समद कौचाली यानी जिल्हा पोलीस अधिक्षकांचे सायबर सेल विभागा कडील बँकआर्थिक फसवणूक शाखेकडे ऑन लाईन केली आहे. सदची घटना तोराडी (ता. म्हसळा) येथे शुकवार दि.१जुलैला रात्री ११.४८ ते ११.५६ या कालावधीत घडली.काही मिनीटांचे फरकाने ४ एंट्री करून कौचाली यांचे आंबेत येथील स्टेट बँक ऑफ इडीयाचे बचत खात्यातील रक्कमेवर सायबर गुन्हेगारानी डल्ला मारला.

कौचाली यानी डीलेव्हरी कुरीअर चा मोबाईल क्र. ७८७२८९९१६८ यावर फोन लावला असता त्यानी पुढील चौकशी मोबा क्रं ८८२६९५५१२२ केली असता त्यावर Contact Name LikelySpan आसल्याचे कौचाली यानी सांगितल.

या नंबर वरून विशाल कुमार यांचा मोबा नंबर आणि Link देण्यात आली आणि आमचा घात झाल्याचे कौचाली यानी आमचे प्रतिनिधीला सांगितले. घडल्या प्रकाराची नोंद ऑन लाईन पध्दतीने करूनही तब्बल ४८ तास झाले तरी अद्याप कोणतीच कारवाई / तपास झाला नाही याची खंत वाटते ४ एंट्री होऊन कौचाली यांचे आंबेत येथील स्टेट बँक ऑफ इडीयाचे बचत खात्या तील रक्कम रु ५४ हजार ९९७ ही एकाच खात्यांत Transfer ने गेली आसल्याचे समजते. म्हसळा तालुक्यात आंबेत, सणदेरी,तोराडी , पांगळोली, मेंदडी,पाभरे या परिसरांतील गावांतून सायबर गुन्ह्यांतून मोठ्या प्रमाणात आर्थिक फसवणूक झाल्याच्या घटना घडल्या आहेत पोलीस विभागाकडून मोठ्या प्रमाणात जनजागृतीची आवश्यकता आहे.






# श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन स्थळे व परिसरात कलम १४४ लागू

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पर्यटक श्रीवर्धन तालुक्यातील धबधबे किंवा तलावाच्या ठिकाणी येतात व दुर्देवाने काही प्रमाणात जीवितहानी होण्याच्या घटना घडतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच धबधबा, धरण व तलाव क्षेत्रात कोणत्याही प्रकारे जीवितहानी होवू नये, याकरिता श्रीवर्धन तालुक्यातील समुद्रकिनारी असलेली पर्यटनस्थळे श्रीवर्धन, हरेश्वर, मारळ, दिवेआगार, कोडीवली व शेखाडी तसेच श्रीवर्धन तालुक्यातील धरण असलेली गावे- कुडकी, कार्ले आणि रानवली, त्याचप्रमाणे धबधबे असलेली ठिकाणे- कोंढे पंचतन व सर्वे या गजबजलेल्या पर्यटनस्थळांच्या ठिकाणी व त्यांच्या १ कि.मी. परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) नुसार पावसामुळे निर्माण झालेले नैसर्गिक धबधब्याच्या परिसरामध्ये मद्यपान करण्यास किंवा मद्यधुंद अवस्थेत प्रवेश करणे, मद्य बाळगणे, मद्य वाहतूक करणे, अनधिकृत मद्य विक्री करणे व उघड्यावर मद्य सेवन करणे, पावसामुळे धोकादायक झालेली ठिकाणे,धबधबे, दऱ्यांचे कठडे, धोकादायक वळणे इ. ठिकाणी सेल्फी काढण्यास व कोणत्याही स्वरुपाचे चित्रीकरण करणे तसेच रहदारीवर परिणाम करणाऱ्या ठिकाणी फोटोग्राफी करणे, पावसामुळे वेगाने वाहणाऱ्या पाण्यात, खोलपाण्यात उतरणे व त्यामध्ये पोहणे, धबधब्यावर जाणे अथवा पाण्याच्या प्रवाहाखाली करणे, सायंकाळी ६.०० वाजल्यानंतर ते सकाळी ६.०० वाजेपर्यंत या कालावधीत धबधबे किंवा तलाव या ठिकाणी पाण्यात उतरणे, वाहतुकीचे रस्ते तसेच धोकादायक ठिकाणी वाहने थांबविणे, वाहन अतिवेगाने चालविणे तसेच वाहतुकीस परिणाम, अडथळा होईल, अशा प्रकारे वाहन चालविणे, वाहनाची ने-आण करताना बेदरकारपणे वाहन चालवून इतर वाहनांना धोकदायक स्थितीत ओव्हरटेक करणे, सार्वजनिक ठिकाणी खाद्यपदार्थ, कचरा, काचेच्या व प्लॉस्टिकच्या बाटल्या, थर्माकॉलचे व प्लॉस्टिकचे साहित्य उघड्यावर इतरत्र फेकणे, सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या महिलांची छेडछाड करणे, टिंगळटवाळी करणे, महिलांशी असभ्य वर्तन करणे, असभ्य व अश्लील हावभाव करणे, शेरेबाजी करणे अथवा लज्ञा निर्माण होईल असे कोणतेही वर्तन करणे, सार्वजनिक ठिकाणी मोठ्या आवाजात संगीत यंत्रणा वाजविणे, डीजे सिस्टीम वाजविणे, गाडीमधील स्पीकर, वूफर वाजविणे व त्यामुळे ध्वनी प्रदूषण करणे, ज्या कृतीमुळे ध्वनी, वायू व जल प्रदूषण होईल अशी कोणतीही कृती करणे, अत्यावश्यक सेवा वगळून धबधब्याच्या १ कि.मी. परिसरात सर्व दुचाकी, चार चाकी व सहा चाकी वाहनांना प्रवेश, करोना विषाणूचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणात असून सोशल डिस्टसिंगचे काटेकोरपणे पालन करणे या सर्व बाबींसाठी दि.१७ जून ते दि.०९ ऑगस्ट २०२२ या कालावधीसाठी श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी प्रतिबंधात्मक आदेश लागू केले आहेत.

# निसर्ग संतुलन राखण्यासाठी वृक्षलागवड व संवर्धन काळाची गरज : राजेंद्र साळावकर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कृषी दिनानिमित्ताने शासनाच्या कृषी विभागामार्फत झाडे लावा झाडे जगवा कार्यक्रम राबविण्यात येत असून निसर्ग संतुलन राखण्यासाठी वृक्षलागवड व संवर्धन काळाची गरज असून त्यासाठी प्रत्येकाने एक तरी झाड लावायचा संकल्प करावा.अशी भावना मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील चिकणी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील शिक्षक राजेंद्र साळावकर यांनी व्यक्त केली आहे.

शासनाच्या झाडे लावा झाडे जगवा योजना राबवून नैसर्गिक समतोल राखण्यासाठी प्रयत्न करीत असून वृक्षतोड थांबविण्यासाठी आवाहन करीत आहे तर आज काही ठिकाणी अनधिकृत रित्या झाडे तोडून वनसंपदेचा -हास होताना दिसत आहे अन्य नैसर्गिक संसाधना प्रमाणेच झाडांनाही नष्ट करण्याचे काम नतद्रष्ट करीत आहेत. जगभरात प्रचंड लोकसंख्या वाढीमुळे अन्नपाणी राहण्यासाठी घरे आणि खूप प्रमाणात सातत्याने जागेची मागणी वाढत असून यामुळे वृक्षतोडीचे प्रमाण वाढत असल्याचे बोलले जात आहे.नैसर्गिक पर्यावरण संतुलन टिकून राखण्यासाठी वृक्षतोड थांबविणे ही आज काळाची गरज आहे.मागील दोन वर्षात आलेले निसर्ग चक्रिवादळ व त्यानंतर झालेली वादळ यामुळे मोठ्या प्रमाणावर वृक्ष उन्मळून वनसंपदेचे नुकसान झाले आहे. शहरात तसेच गावागावातून वाहनांमुळे होणारे वायुप्रदूषण वाढत असून सातत्याने होणा-या वृक्षतोडीमुळे हवेत निर्माण होणाऱ्या प्राणवायू (ऑक्सिजन)वर परिणाम होत असून श्वसनाच्या विकारात वाढ होत आहे. वृक्षतोड थांबविण्यासाठी प्रयत्न न झाल्यास लवकरच वनसंपदे बरोबरच मानवी जीवन उद्धस्त व्हायला वेळ लागणार नाही

कोरोना जागतिक महामारीत ऑक्सीजनचा तुटवडा असल्याने कित्येक जणांना मृत्यू ला सामोरे जावे लागले होते. पृथ्वीवरील अशा प्रकारच्या दुर्धर प्रसंगाना बळी पडू नये. यासाठी आपण वेळीच वृक्षतोड थांबवायला हवी. जास्तीतजास्त लोकांमध्ये झाडे लावा झाडे जगवा हा संदेश तळागाळापर्यंत पोहाचायला हवा. जगण्यासाठी मानवी जीवनात झाडाला महत्त्वाचे स्थान आहे. पृथ्वीवरील सजीवांना जीवन जगासाठी वृक्ष महत्वाची भूमिका बजावतात. पृथ्वी आणि पर्यावरणाला स्वच्छ ठेवण्याचे काम वृक्ष करतात. म्हणून आपल्याला देखील झाडांच्या संरक्षणासाठी पूर्ण जबाबदार व जागरूक बनायला हवे. झाडे ही निसर्गाने मनुष्याला मिळालेले वरदान आहे. निसर्ग संतुलन राखण्यासाठी सर्वांनी झाडांचे संरक्षण करणे हे आपले कर्तव्य समजून यासाठी जूनपासून पुढे किमान एक तरी झाड लावून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी संकल्प करु या.

# जिल्ह्यात दि.१३ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि.१३ ऑगस्ट २०२२ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे, असे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश श्री.अमोल अ. शिंदे यांनी कळविले आहे.

न्यायालयात प्रलंबित असलेली भूसंपादन प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे १३८ एन. आय ॲक्ट खालील प्रकरणे, दिवाणी अपिले, तडजोडपात्र पालिका व ग्रामपंचायत यांच्या घरपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, वीजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये प्रकरणे तडजोडीने निकाली केल्यास लोकांचा पैसा आणि वेळ यांचा अपव्यय होत नाही, पक्षकारांना तात्काळ न्याय मिळतो. न्यायालयात भरलेले कोर्ट शुल्क परत मिळते. त्यामुळे दि.१३ ऑगस्ट २०२२ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष श्रीमती एस.एस. सावंत यांनी केले आहे.

# कमांडिंग ऑफिसर कमोडोर आदित्य हाडा, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांनी केले अभिवादन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या २९३ व्या स्मृतीदिनानिमित्त भारतीय नौदलाचे पश्चिमी क्षेत्र मुख्यालय भारतीय नौसेना पोत आंग्रे या नौदल तळाचे कमांडिंग ऑफिसर कमोडोर आदित्य हाडा यांनी भारतीय नौदलाच्या वतीने पुष्पचक्र तर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, रघुजीराजे आंग्रे सरखेल, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंके यांच्यासह विविध मान्यवरांनी मराठा आरमाराच्या सरखेलांच्या समाधीवर पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली.

दरवर्षी दि.०४ जुलै रोजी या महान सागर वीराला अलिबाग नगरपरिषदेद्वारे अभिवादन केले जाते. या वर्षी गाज या सरखेल रघुजीराजे आंग्रे यांच्या उपक्रमांतर्गत भारतीय नौदलाच्या अधिकाऱ्यांना प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रित करून नौदल तथा महाविद्यालयीन विद्यार्थी यांच्यात संवाद प्रस्थापित करण्याकरिता जेएसएम महाविद्यालय येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यक्रमांतर्गत कमोडोर आदित्य हाडा यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. सरखेल आंग्रे यांना भारतीय नौदल आपला मानबिंदू मानते आणि त्यांच्या नीती धोरणांचे आधुनिक नौदल आजदेखील अनुसरण करते, हे कमोडोर हाडा यांनी विशेषत्वाने नमूद केले.

सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांचे कार्य, तत्कालीन परिस्थितीत मराठा नौदलाची आवश्यकता, आजच्या आधुनिक काळात कान्होजींच्या विचारांची प्रासंगिकता आणि आजच्या तरुणांसाठी आधुनिक नौदलातील भविष्यकालीन संधी याबाबत कमोडोर हाडा यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

तसेच भारतीय नौसेना भविष्यात अलिबाग आणि परिसरातील अनेक लोकोपयोगी प्रकल्पात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवेल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

या कार्यक्रमाप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, रघुजीराजे आंग्रे सरखेल, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, माजी उपनगराध्यक्षा ड.मानसी म्हात्रे, मुख्याधिकारी अंगाई साळुंके, जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ड.गौतम पाटील, जेएसएम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील, आरडीसीसी बँकेचे अध्यक्ष प्रदीप नाईक, मंगेश दळवी, नगरपालिका शाळांचे शिक्षक-विद्यार्थी व इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंके यांनी केले. सरखेल रघुजीराजे आंग्रे यांनी गाज च्या माध्यमातून भारतीय नौसेना आणि नागरिकांच्या सहयोगाने कोकण किनारपट्टीवर अनेक लोकोपयोगी प्रकल्प हाती घेण्यात येणार असल्याचे सूतोवाच केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन 'कस्बा' या हेरिटेज मॅनेजमेंट कंपनीचे संचालक सचिन सावंत यांनी केले.